RNI No: MAHMAR/2004/13776 :: Postal Registration No: MNW/35/2017-2019
Published on : 12 January, 2017 :: Posted at Kandivli(w) Post Office, Mumbai on 14 January, 2017

अजायब बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : चौदा | अंक : सातवा | जानेवारी २०१७

नवीन वर्ष – नवीन मनुष्यजन्म (संदेश) 5

हे जग विषय-विकारांचे जंगल आहे (सत्संग) 11

प्रश्नोत्तरे (प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे) 21

भक्तीचे ईनाम (ध्यान-अभ्यासा विषयी संदेश) 31

धन्य अजायब (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहीती) 34

मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई – 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई – 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

नवीन वर्ष – नवीन मनुष्यजन्म

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे संगतला नुतन वर्षाचा संदेश
संतबाणी आश्रम, १६ पी. एस. राजस्थान, १ जानेवारी १९९०



हुजूर सावन आणि कृपालजींच्या नावे तुम्हां सर्वांना नुतन वर्षाच्या हार्दीक शुभेच्छा. मला आशा आहे की, हे नवीन वर्ष तुम्हां सर्वांसाठी आनंदमय असेल आणि या नुतन वर्षामध्ये तुम्ही जास्तीत जास्त ध्यान–नामस्मरण करू शकाल.

हिंदुस्थानातील अनेक समाजांचा असा समझ आहे की आजच्या दिवशी पहाटे तीन वाजता नदी, तलाव वा कालव्यांमध्ये जाऊन स्नान केल्याने खूप पुण्य लाभते. आजच्या दिवशी अनेक लोकं आप–आपल्या भाषेमध्ये परमेश्वराची आराधना करतात. परंतु आपले सौभाग्य आहे की आपणांस परमेश्वराशी जुडण्याची संधी लाभली आहे.

जेव्हापासून मनुष्य निर्माण झाला, तेव्हापासूनच ही परंपरा चालत आलेली आहे की प्रभू आपल्या अंतर्यात वसतो. ज्या तीर्थस्थळी जाऊन स्नान केल्यावर जन्मो–जन्मांतरीच्या पापांचा मळ उतरतो त्या तीर्थस्थळी जाऊन तुम्ही स्नान करावे. ते स्थळ आपल्या शरीरामध्ये दशमद्वारी आहे. संत नेहमी त्या तीर्थस्थानाचा महिमा वर्णन करतात. आपल्या आत्म्यावरील स्थूल, सूक्ष्म आणि कारण ही तीन आवरणे आपण दूर सारल्यानंतर आपला आत्मा तेथे स्नान करतो. तेथील स्नानाचे महत्त्व संतांनी आपणांस सांगूनही आपण येथील बाह्यजगातील कर्मकांडांमध्ये रममाण झालो आहोत. तेच खरे शिष्य व खरे संत आहेत जे पहाटे उठून दशमद्वारी पोहचून स्नान करतात. गुरू नानकदेवजी महाराज सांगतात:

गुरु सतगुरु का जो सिख अखाए, सो भलके उठ हर नाम ध्यावे।
उद्यम करे भलके प्रभाती, स्नान करे अमृतसर न्हावे।।

महात्मा सांगत आहेत,''आपण शिकल्या–वाचल्याने तसेच या जगातील कोणतीही कर्मकांडे वा रीती–रिवाज केल्याने सचखंडात पोहचू शकत नाही. हा केवळ तोंडी जमा–खर्च असून त्यातून काहीच फायदा होत नाही.''

कबीर साहेब सांगतात, ''काळी घोंगडी धुवून स्वच्छ करण्यासाठी आपण भलेही शंभर मण साबणाचा वापर केला, तरीही घोंगडी पांढरी शुभ्र होत नाही,'' मनमुखास काळी घोंगडी वा कावळा असे संबोधले गेले आहे. कावळ्याचा आहार घाण तर राजहंसाचा आहार मोती आहे. नामाचा जप करणे व प्रभू–परमेश्वराशी जुडणे हा गुरूमुखांचा आहार असतो. जे गुरूमुखांच्या सान्निध्यात येतात, त्यांनादेखील गुरूमुख प्रभू–परमेश्वराशी जोडतात.

ऋषी–मुनींनी मेहनत करीत नामाची कमाई केली, ते शरीर सोडून ब्रह्मांडामध्ये गेले. त्यांनी अंतर्यात जे काही पाहिले, त्यांची नोंद त्यांनी धर्म–पुस्तकांमध्ये केली. बाह्यजगात वाहणाऱ्या गंगा, जमुना आणि सरस्वती या तिन्ही नद्यांचा जेथे संगम होतो, त्या ठिकाणी स्नान करण्यास लोकं अतिशय पवित्र मानतात. कबीर साहेब सांगत आहेत :

तीन नदी त्रिकुटी मांही।

तुम्ही शरीर सोडून ब्रह्मांडामध्ये गेल्यावर तुम्हांस या तिन्ही नद्या अंतर्यातच सापडतील. त्यामध्ये स्नान केल्याने तुमचा जन्मोजन्मांतरापासून निद्रावस्थेमध्ये असलेला आत्मा जागृत होईल, तो पवित्र होईल. तुमचा आत्मा मनमुखाकडून गुरूमुख होण्याच्या दिशेने वाटचाल करू लागेल. गुरू अमरदेवजी महाराजांनी अंतर्यामधील असली अमृतसर पाहून आपल्या वाणीत लिहिले :

सच्चा अमृतसर काया माहे मन भीवे पाहे सो पाहे हे।

गुरू अमरदेवजी महाराज सांगत आहेत. ''तुमच्या अंतर्यात असलेल्या अमृतसरात जाऊन तुम्ही स्नान करा.'' बाहेरील अमृतसरबद्दलही आपणा सर्वांस खूप आदर आहे. गुरू रामदासजींनी याचा पाया रचला होता तर पाचवे गुरू अर्जुनदेवजींनी त्यास पुर्णत्वास नेले.

गुरू रामदासजी महाराज जेव्हा याचा पाया रचू लागले. तेव्हा ते गवंडी काम करणाऱ्यास म्हणाले,''प्रिय मित्रा, आपण येथे दशमद्वारातील कमळाप्रमाणे मंदिर बनवू जेणेकरून लोकांच्या हृदयात अशी इच्छा निर्माण व्हावी की आपणही अंतर्यातील कमळामध्ये जाऊन स्नान करावे व आपल्या आत्म्यावरील जन्मोजन्मांतरापासून साचलेल्या वाईट कर्मांचा मळ धुवून साफ व्हावा. त्यांच्या हृदयात अंतर्यात जाण्याचा उत्साह निर्माण व्हावा.'' तो गवंडी कधीच अंतर्यात गेला नव्हता. त्यामुळे दशमद्वारातील कमळाची प्रतिकृती बनविणे त्यास कसे जमणार? तो म्हणाला, ''मी ते कमळ पाहिले नसल्याने मला त्याची प्रतिकृती बनविणे अवघड आहे.'' गुरू रामदासजींनी गवंड्यास ध्यानात बसविले व आपले ध्यान एकाग्र करून त्याची सुरत अंतर्यात घेऊन गेले.

एखाद्या वस्तुस स्वत: अंतर्यात पाहिल्यानंतर तिची प्रतिकृती बनविणे सोपे असते. गुरू रामदासजींनी आपल्या ध्यानाद्वारे गवंड्याची सुरत पुन्हा खाली आणली आणि त्यास विचारले, ''काय बंधु! आता बनवशील का?'' तो गवंडी म्हणाला, ''महाराजजी, मला तेथेच राहू द्या.'' गुरू रामदासजी म्हणाले, ''अगोदर तू बाहेर प्रतिकृती बनव, मग तुला तेथे घेऊन जाईन.''

प्रियजनहो, महात्म्यांनी आपल्यासाठी धर्मग्रंथांमध्ये ज्या सूचना दिलेल्या आहेत त्यांचे पालन करणे हे आपले कर्तव्य आहे. ज्याप्रमाणे त्यांनी त्यांच्या गुरूंकडे जाऊन नामदान प्राप्त केले व मेहनतीने ध्यान–अभ्यास केला, त्याप्रमाणे आपणही केले तर आपण परमार्थामध्ये यशस्वी होऊ शकतो.

दरवर्षी आपण आपल्या शुभचिंतकांना, नातेवाईकांना आणि मित्र–मंडळींना नुतन वर्षांचे अभिष्टचिंतन करतो. जर कुणी दूर राहत असेल, तर त्यास आपण पत्राद्वारे नुतन वर्षाच्या शुभेच्छा लिहून पाठवितो.

संत–महात्मे जेव्हा कधी या जगात येतात, तेव्हा ते अतिशय प्रेमाने आपल्या आत्म्यांना, आपल्या मुलांना संदेश देतात की, प्रत्येक **नवीन वर्ष नवीन मनुष्यजन्माप्रमाणे** असते. ते आपणांस हाच शुभ संदेश देतात की गत वर्षांमध्ये तुम्ही सुरत–शब्दाचा अभ्यास केला नाहीत, तो यावर्षी करून हे आयुष्य यशस्वी करावे.

गुरू अर्जुनदेवजी महाराज आपल्या आत्म्यांना संदेश देताना सांगत आहेत की, मनुष्य जन्माच्या रूपाने तुम्हाला नवीन शरीर मिळाले आहे.

माघ मज्जन संग साधुआं धूड़ी कर स्नान।
हर का नाम ध्याए सो सबना लोक निदान।
जन्म कर्म मल उतरे अन्ते जाए गुमान।।

गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात की, काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार या जगास एखाद्या माकडाप्रमाणे नाचवित आहेत. रात्रंदिवस लोभरूपी कुत्रा भुंकत आहे. 'शब्द–नाम' हाच खरा मार्ग असून त्यांची कमाई केल्याने हे सर्व दरोडेखोर शांत होतात. मग पुढे काय होईल? *उस्तत करे जहान.* जो मनुष्य सर्व विश्वाला आपलेसे मानतो, त्याला परमेश्वरदेखील आपला मानतो. स्वामीजी महाराज सांगतात :

अपने जीव की दया पा लो चौरासी का फेर बचा लो।

जेव्हा आपण ध्यान–नामस्मरण करतो, तेव्हा ते करीत असता आपण कुणावरही उपकार करीत नसतो. ती तर आपण स्वत:वरच दया करीत असतो. जो मनुष्य स्वत:वर दया करतो, तो इतरांवरही दया करू शकतो.

महाराज कृपालजींनी आपणांस आत्मनिरीक्षणाची डायरी लिहिण्याचा सल्ला देत सांगितले होते की, प्रत्येक महिन्याचा आपल्या कर्मांचा हिशोब लिहा की या महिन्यात किती पापं आपल्या हातून घडली? कुणाची किती निंदा केली? इतरांचे किती पैशांचे नुकसान केले वा फायदा केला? आपण किती ध्यान–अभ्यास व नामस्मरण केले? महिन्याच्या सुरुवातीस आपण अंतर्यात काय अनुभव घेत होतो, तसेच महिना अखेरीस आपली अंतर्यात उन्नती झाली की अवनती झाली?

तुम्हां सर्वांना शुभेच्छा देत मी हेच सांगेन की, तुम्ही तुमचे जीवन त्या डायरीनुसारच बनवा. दररोज सतगुरूंना साक्षी मानून अतिशय प्रामाणिकपणे तसेच मनाची तमा न बाळगता डायरीमध्ये नोंद करा. एकदा झालेली चूक पुन्हा आपल्या हातून घडू नये याची काळजी घ्या, तसेच संपूर्ण वर्षाचा तुम्ही हिशोब मांडा की या वर्षामध्ये ध्यान–अभ्यास व नामस्मरणामध्ये आपली किती उन्नती झाली वा आपली किती अवनती झाली? अवनती झाली तर का झाली? उन्नती झाली असल्यास आपण अधिक ध्यान–अभ्यास व नामस्मरण करीत अंतर्यामध्ये उन्नती कोणत्या गोष्टींमुळे करू शकलो?

परमात्म्याने आपल्यावर विशेष कृपा करून आपणा सर्व जीवांना चौऱ्यांशी लक्ष योनींमधील शिरोमणी योनी म्हणजे मनुष्य–जन्म दिला आहे, जो इतर सर्व योनींपेक्षा सर्वश्रेष्ठ आहे. गुरूंनी आपल्यावर अपरंपार कृपा करीत आपणांस नामाचे बक्षिस दिले आहे. तेव्हा आपलेही कर्तव्य आहे की शब्द–नामाची कमाई करीत आपले हे आयुष्य यशस्वी करावे.

***



हे जग विषय-विकारांचे जंगल आहे

सत्संग : परमसंत अजायब सिंहजी महाराज, गुरू अर्जुनदेवजी महाराजांची वाणी
इटली - २१ मे, १९८९

मी माझे परम सतगुरू परमात्मारूप सावन-कृपालजींचा अतिशय आभारी आहे की ज्यांनी मला तुमच्या देशामध्ये, तुमची सेवा करण्यासाठी पुन्हा आणले आहे. सेवकाची दोरी सतगुरूंच्या हातात असते. सेवक एखाद्या कळसूत्री बाहुल्याप्रमाणे असून, कलाकार जो काही खेळ खेळवितो, तोच खेळ ते कळसूत्री बाहुले खेळते. एका भजनामध्ये तुम्ही वाचता:

जित्थे भेजे दाता जांवां, तेरा दित्ता सदा ही खांवां।
मैं हां पुतली, तेरे हत्थ डोर दातेया।।

संतमत एक सत्य असून, ते निसर्गाच्या नियमानुसारच आहे. मी नेहमी सांगत असतो की, संतमत कृती (स्वत: ध्यान-अभ्यास) करण्याचे मत असून ते केवळ चर्चा करण्याचे मत नाही. ज्याने नामाची कमाई केली, जो संतांच्या कृपेने अंतर्यात गेला, तो ही गोष्ट खोटी आहे असे म्हणू शकला नाही, तो त्यांचाच होऊन गेला. ध्यान-अभ्यासामध्ये यशस्वी होण्यासाठी अभ्यासी व्यक्तीस काही अटींचे पालन नक्कीच करावे लागते. त्यास स्वत:च्या पदवीचा अभिमान त्यागावा लागतो. आपणांस या जगाच्या मित्र-मंडळींच्या टोमण्यांना तसेच इतर सामाजिक लोकांच्या खोचक बोलण्यास सामोरे जावे लागते. निंदा-चुगली तर भक्तीच्या द्वाराचे पहारेकरी असतात. या जगातील मान-सन्मान मिळाल्याने परमात्म्याच्या प्रियजनांना आनंद होत नाही व जे लोक त्यांचा निरादर करतात त्यांकडेदेखील ते लक्ष देत नाहीत. ते या दोघांमधील समन्वयक मार्गाचा अवलंब करतात.

या जगातील लोकांना दु:ख-कष्टांनी घेरलेले पाहून परमात्मा कृपा करतो, त्याच्या अंतरात प्रेमाचा सागर उचंबळून येतो. तो स्वत: सतगुरूंचे

रूप धारण करून या जगामध्ये येतो. या जगाच्या डोक्यावर दु:ख आणि चिंतांचे ओझे असून, त्या ओझ्याखाली दबल्याने जगास स्वत:चा विसर पडलेला आहे. आपण जीव इंद्रियांच्या भोगांमध्ये फसलो आहोत. जेवढा जास्त इंद्रियांचा भोग घेतला जातो, तेवढे जास्त आजार होतात.

आपण नामरूपी सुख-सागराकडे पाठ फिरवलेली आहे. त्यामुळे आपण विषही ग्रहण करतो, सोबत वेदनेने कण्हतही असतो. क्षण-भंगुर कामाचे आवेग व क्षण-भंगुर सांसारिक सुखं आपणांस दु:खांच्या नदीत वाहून नेतात. तरुण सुखांची स्वप्ने पाहत-पाहत वृद्ध होतो. सांसारिक सुखांच्या शोधामध्ये खूप ऐहीक साधन-सामुग्रीचा संग्रह करतो. परंतु जेवढा हा साधन-सामुग्रीचा संग्रह मोठा, तेवढ्या मोठ्या प्रमाणात चिंता आणि दु:खांची निर्मिती होते.

संत-महात्मा आपणांस केवळ उपदेशच करीत नाहीत, तर आम्हा परमात्म्याचा विसर पडलेल्या जीवांना बेफिकीरीच्या गाढ निद्रेतून जागृत करण्यासाठी ते येत असतात. तुमच्या समोर गुरू अर्जुनदेवजींची वाणी सादर केली जात आहे. हे जग जसे गुरू अर्जुनदेवजींच्या नजरेस पडले, त्याच्या वास्तव्यतेचे वर्णन त्यांनी अतिशय वेदनामय शब्दांमध्ये केले आहे. महात्मा कधीच एखाद्या विशिष्ट कुटुंबाकरीता वा विशिष्ट समाजाकरीता वा देशाकरीता येत नाहीत. त्यांना या गोष्टींचे काहीच आकर्षण नसते. ते सकल विश्वाला आपले घर मानतात. प्रत्येक देशावर प्रत्येक समाजावर आणि प्रत्येक जातीवर त्यांचे एकसमान प्रेम असते.

महात्म्यांची वाणी एखाद्या विशिष्ट वेळेपुरती लागू न होता, ती कधीही बरोबर लागू पडते. आपण ती वाणी नीट समजून घेऊनच त्या वाणीतून आपला फायदा करून घेऊ शकतो. सर्व महात्म्यांनी नामाचा महिमा आणि परमेश्वर प्राप्तीचे फायदे वर्णिले आहेत. जी व्यक्ती गुरू-शब्दामध्ये तल्लीन होऊन शब्दरूप बनते, ती व्यक्ती सतगुरूंच्या प्रेमाचे गीत गाऊ लागते.

जोपर्यंत महात्मा या जगामध्ये देहस्वरूपात असतात, तोपर्यंत त्यांच्या उपदेशाचा लोकं खऱ्या अर्थाने फायदा करून घेतात. जेव्हा ते देह सोडून या जगातून निघून जातात, त्यानंतर अंतर्यामध्ये न जाणारे त्यांचेच अनुयायी रीती-रिवाज करू लागतात, आपला स्वार्थ साधण्यासाठी महात्म्यांच्या शिकवणुकीचा चुकीचा अर्थ इतरांना सांगतात. तुम्ही विचार करा! ज्या व्यक्तीने स्वत:च्या नेत्रांनी हत्ती पाहिलेला असतो, ती व्यक्ती नेत्रहीनांच्या सांगण्यावर विश्वास ठेवीत नाही, जर केली तर ती व्यक्ती परमात्म्याच्या भक्तीमार्गावरून दूर जाईल.

संत-महात्म्यांचे नेत्र उघडलेले असतात. त्यांनी स्वनेत्रांनी परमात्म्यास पाहिलेले असते. ते स्वत: पाहूनच परमात्म्याचे वर्णन करतात. परंतु आम्हा सामाजिक लोकांनी परमात्म्यास पाहिलेले नसते, परमात्म्याची भेट घेतलेली नसते, त्यामुळे महात्म्यांच्या उपदेशास आपण धार्मिक स्वरूप देतो. आपण स्वत: विवाह न करता इतरांच्या विवाहांमध्ये गाणे गाण्याचा काय उपयोग? आपण म्हणतो आमच्या धर्मामध्ये इतके भक्त होऊन गेले, परंतु स्वत: मात्र भक्ती करीत नाही, मग त्या भक्तांचे वर्णन करून काय उपयोग? खरेतर महात्म्यांनी त्यांच्या वाणीत जे काही वर्णिले आहे, त्याचा स्वत: अंतर्यात जाऊन अनुभव घेणे आपले कर्तव्य आहे.

बिखै बन फीका त्याग री सखिऐ नाम महारस पीओ।

गुरू अर्जुनदेवजी महाराज या जगाचा फोटो काढून आपल्या समोर ठेवत आहेत की **हे जग विषय-विकारांचे जंगल आहे**. आपणांस या जगातील रस भलेही स्वादीष्ट भासतात, परंतु ते क्षणभंगुर असतात व नंतर आपणांस आयुष्यभर त्यांचा कडू स्वाद घेत राहावा लागतो व दु:खी व्हावे लागते. मन इंद्रियांच्या नादी लागून आपला आत्मा या विषय-विकारांच्या जंगलामध्ये भरकटत राहतो. गुरू रविदासजी सांगतात:

मृग मीन भृंग पतंग एक दोष विनाश।
पंच दोष असाध जामें ताकी केतक आस।।

हत्तीमध्ये एकच काम-वासनेचा दोष असतो. त्यामुळे हत्तीला पकडणारी लोकं, एक खोल खड्डा खणून तो पाला-पाचोळ्याने झाकतात आणि त्यावर एक नकली कागदी हत्तीण बनवून उभी करतात. हत्तीमध्ये संयम नसतो, कामाच्या आवेगात हत्ती बेकाबू होतो व तो त्या हत्तीणीकडे जात असता खड्ड्यात पडतो. त्यास अनेक दिवस त्या खोल खड्ड्यात उपाशी ठेवले जाते. जेव्हा तो शक्तीहीन होतो तेव्हा त्यास पकडले जाते. एवढ्या शक्तीवान हत्तीस अंकुशाने मारत-मारत ते आपल्या काबूत करतात. नंतर तो आयुष्यभर त्यांचे ओझे उचलण्याचे काम करत राहतो. हत्तीमध्ये काम हा एकच गुणदोष होता. एका क्षणभंगूर स्वादासाठी एवढे मोठे जनावर कैदी बनते.

मी नेहमी सांगत असतो की कामाचा आवेग मनुष्यास अंध आणि वेडा बनवून टाकतो. त्यास जवळ उभा असलेला मनुष्यही दिसत नाही. कबीर साहेब सांगतात कामी मनुष्य निर्लज्ज असतो. तो भक्ती करू शकत नाही. ज्या आत्म्यास अध्यात्मिक मंडळांमध्ये वर चढाई करावयाची असते, तो आत्मा काम-वासनेच्या दोषामुळे खाली घसरतो.

सर्वांनी मृग पाहिलेले आहे. तो किती शक्तीशाली प्राणी असतो? तो खूप मोठ-मोठ्या उड्या मारत दूर-दूरवर वेगात पळतो. परंतु त्यास गुणदोष आहे तो कर्ण-रसाचा. शिकारी लोकं जंगलामध्ये जाऊन एक विशिष्ट वाद्य वाजवितात, ज्यास कंडाहेडीची वाणी (ध्वनी) असेही म्हटले जाते. तो ध्वनी ऐकून मृग त्यामध्ये तल्लीन होते. त्यावेळी मृगास विसर पडतो की हे लोक मला ठार मारू शकतात. कर्ण-रसाच्या आहारी जाऊन ते मृग आपले मस्तक त्या वाद्यावर ठेवते. तो कर्ण-रसच मृगाचे प्राण-हरण होण्यास कारणीभुत ठरतो. मग त्याची हत्या करून शिकारी विस्तवावर हंडी ठेवून त्याचे मांस शिजवितात.

मगर देखील एक अतिशय ताकतवान प्राणी असतो. खरेतर मनुष्य त्याच्या समोर कस्पटासमान आहे. परंतु मगरीस खाद्याची अतिशय आवड असते. हा तिचा गुणदोष आहे. त्यामुळे शिकारी मांस गळामध्ये अडकवून तो गळ पाण्यामध्ये सोडतात. ते मांस पाहून मगर अनावर होते व ते मांस खाण्याच्या नादात शिकाऱ्याचा गळ स्वत:च्या घशामध्ये अडकवून घेते. मगरीस शिकारी पकडतात व तिचे मांस शिजवितात.

पतंगास (एक किडा ज्यास प्रकाशाचे आकर्षण असते) नजरेचा गुण-दोष असतो, तो प्रकाशाकडे आकर्षित होतो. दूर-जवळ कोठेही दिवा जळत असेल, तर तो त्या दिव्याच्या ज्योतीमध्ये जळून स्वत:चे प्राण गमावतो.

गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगतात की, काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार हे पाच दरोडेखोर असून, त्यांच्या समोर आत्मा एकटा असतो. घरात आपण निद्रेत आहोत व ते देरोडेखोर आपल्या घरात घुसून आपले घर लुटत आहेत. या दरोडेखोरांपासून आई-वडील, भाऊ-बहिण, कोणताही समाज वा शिक्षण-वाचन यापैकी कोणीही आपले रक्षण करू शकत नाही. आपण सांगत आहात:

साध संग ओह दुष्ट वस होते।

साधू-संतांकडे जाऊन जे लोक शपथ घेतात की आम्ही कानांना स्पर्श करतो, आम्ही पुन्हा चुकूनही या विषयांची चव घेणार नाही, तेच लोक या विषयांवर ताबा मिळवितात. अशा लोकांना संत सदैव मदत करतात.

महाराज सावन सिंहजी सांगत असत की,''मुल जर खूप मेहनतीने, अंत:करणापासून अभ्यास करीत असेल तर शिक्षकदेखील त्या मुलाकडे अधिक लक्ष देतात.'' हा मार्ग नामाची कमाई, ध्यान-अभ्यास करण्याचा आहे. आपल्या सतगुरूंवर आपला पूर्ण विश्वास आणि प्रेम असेल तरच आपण ध्यान-अभ्यासामध्ये उन्नती करू शकतो. जेवढे आपले प्रेम जास्त, तेवढी अधिक उन्नती आपण अंतर्यात करतो. तुलसी साहेब सांगतात:

काम क्रोध लोभ मोह अहंकार की जब लग घट में खान।
क्या पंडित क्या मूर्खा दोनों एक समान।।

गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगत आहेत की **हे जग विषय-विकारांचे जंगल आहे**. जेवढे शक्य असेल तेवढे लवकर येथून पलायन करून तुम्ही सतगुरूंच्या किल्ल्यामध्ये जाऊन लपा. संतोष, धैर्य, विवेक आणि वैराग्य त्या किल्ल्याच्या भिंती आहेत. नामदान देतेवेळी आपणांस जी बैठक सतगुरूंनी सांगितलेली असते, तेथे म्हणजे तीसऱ्या तिळावर जाऊन आसनस्थ व्हा.

बिन रास चाखे बुड़ गई सगली सुखी न होवत जीओ।

एका वेळी तुम्ही एकच आस्वाद घेऊ शकता, मग तो तुम्ही विषय-विकारांचा आस्वाद घ्या किंवा नामाचा आस्वाद घ्या. दोन्ही वस्तु तुमच्या अंतरामध्येच आहेत. आजारही तुमच्या अंतरात आहे आणि औषधही तुमच्या अंतरामध्ये आहे. या जगामध्ये नामरसाचा आस्वाद घेतल्याशिवाय अनेकजण आले, अनेकजण गेले, परंतु कोणीही सुखी बनू शकला नाही. नामाशिवाय जगणे म्हणजे आपण सुखांच्या भंडाराकडे पाठ केल्यासमान आहे. नामाशिवाय कोणी सुखी झाला नाही, कुणास शांती लाभली नाही.

मान महत न सकति ही काई साधा दासी थीओ।

गुरू अर्जुनदेवजी सांगत आहेत, ''कोणत्या वस्तुचा तुम्हांस अभिमान आहे? धन-संपत्ती आणि पदवी यांचा अभिमान सोडून द्या, कारण त्यांपैकी काहीही मरणोत्तर तुमच्या सोबत जाणार नाही वा आपली मदत करणार नाही. त्यामुळे हे सर्व सोडून तुम्ही साधुंकडे जाऊन नामाची कमाई करा.''

नानक से दर सोभावंते जो प्रभ अपनै कीओ।।

ज्या वस्तुंचा मी वर उल्लेख केला आहे त्या वस्तू आपणांस परमात्म्यापासून दूर नेतात. जेव्हा आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष करून नामरसाकडे लक्ष देतो,

तेव्हा परमात्मा आपणांस शोभिवंत करून ईनाम देतो, आपलेसे करतो आणि स्वगृहामध्ये आपणांस स्थान देतो. असे महात्मा परमात्म्याचे प्रतिनिधी बनतात, हरि-जन बनतात. त्यांना ठाम विश्वास असतो की परमात्म्याच्या आदेशाशिवाय येथील पानाही हलू शकत नाही. जे काही घडत आहे, जी काही सुखं-दु:खं आहेत, ती परमात्म्याच्या मर्जीनुसारच आहेत.

गुरू तेगबहादुर साहेब सांगतात,''संत-महात्मा आदर-सन्मान आणि निंदेस महत्त्व देत नाहीत. सोने आणि माती त्यांच्यासाठी एकसमान असते. ते मान-अभिमान एकसमान मानतात. असे महात्मा जिवंतपणीच परमेश्वररूप बनतात, त्यांच्या मुखातून परमेश्वरच बोलत असतो.''

हरचंदौरी चित भ्रम सखीए मृग तृसना द्रुम छाया।

गुरू अर्जुनदेवजी महाराज आणखी एक उदाहारण देत आहेत, ''हे जग नकली नगर आहे. अनेकदा आकाशात निरनिराळ्या छटा दिसतात ज्या एखाद्या मृगजळाप्रमाणे असतात. उन्हाळ्यामध्ये निर्माण होणाऱ्या उष्णतेने पाण्याचा भास होतो, ज्यास मृगजळ म्हणतात. ते पिण्यासाठी मृग त्याच्या मागे पळत राहते. मृग पुढे पळत गेल्यावर ते मृगजळ आणखीन पुढे जाते. अखेरीस तहानेने व्याकूळ होऊन पाण्याअभावी ते मृग तडफडून मरते.''

चंचल संग न चालती सखीए अंत तज जावत माया।

गुरू अर्जुनदेवजी महाराज सत्य विदीत करतात की, ''मरणोत्तर हे जग वा या जगातील वस्तू आपल्या सोबत जाणार नाहीत तसेच इंद्रियांचे भोगही आपणांस साथ देणार नाहीत. यांचा त्याग करून आपण आपल्या सोबत चांगल्या-वाईट कर्मांचे गाठोडे घेऊन जाणार आहोत.''

रस भोगण अति रूप रस माते इन संग सूख न पाया।
धंन धंन हर साध जन सखीए नानक जिनीं नाम ध्याया।।

जगाच्या रसभोगांपासून आजपर्यंत कुणास सुख मिळाले आहे, ना यापुढे ते मिळेल. मनुष्य-जन्म प्राप्त झाल्यावर परमेश्वराच्या भक्तीमध्ये रममाण होणारे साधु-महात्मा धन्य आहेत, ते पूजनिय आहेत.

जाए बसो वडभागणी सखीए संतां संग समाईऐ।
तह दूख न भूख न रोग ब्यापै चरन कमल लिव लाईऐ।।

कोणते आत्मे पवित्र आहेत, भाग्यवान आहेत? संतांच्या संगतीमध्ये तुम्ही जावे. ते तुम्हांस सचखंडास घेऊन जातील, जेथे जन्म-मृत्यू नाही, रोगराई नाही, शोक-विलाप नाही.

महाराज सावन सिंहजी सांगत असत, ''तुम्ही आणखीन काही करू शकत नसाल, तर तुम्ही निर्मळ अंत:करणाने संतांवर प्रेम तरी करा. ज्यांच्यावर आपले प्रेम असते, त्यांची आठवण आपणांस आपल्या अंतसमयी येथे. अखेरीस जेथून संत येतात, तेथेच ते आपणांस घेऊन जातात.'' संत रविदासजी महाराज सांगतात:

बे गमपुरा शहर का नाम दुख अंधेरा नहीं तेह ठाव।

तेथे दु:ख नाही, भूक नाही, रोगांनी जर्जर झालेले शरीर मिळत नाही. कुणी त्यास सचखंड म्हटले तर कुणी बे गमपुरा म्हटले आहे. तेथे कोणतेही दु:ख नाही, तेथे नामाचा प्रकाशच प्रकाश आहे.

तह जन्म न मरण न आवण जाणा निहचल सरणी पाई ऐ।
प्रेम बिछोह न मोह ब्यापै नानक हर एक ध्याई ऐ।।

आपण सांगता, ''तेथे जन्म-मृत्यु, भेट-विरह नाही. तेथे केवळ प्रेमच-प्रेम आहे. तो प्रेमाचा देश आहे. तेथे आत्म्यास प्रेमाचाच आहार मिळतो.''

दृस्टि धार मन बेधया प्यारे रतड़े सहज सुभाए।
सेज सुहावी संग मिल प्रीतम अनंद मंगल गुण गाए।।

गुरू अर्जुनदेवजी महाराज सांगत आहेत, ''आम्ही ऐकीव गोष्टी सांगत नाही, आम्ही हे सर्व स्वत:च्या नेत्रांनी पाहिलेले आहे की कशाप्रकारे आत्मा आणि परमात्म्याचे मिलन होते. प्रभुच्या शय्येवर आत्म्यास अशाप्रकारे ठाव मिळतो ज्याप्रमाणे पाण्याचा थेंब समुद्रामध्ये गेल्यावर समुद्र म्हणून गणला जातो. साखर बत्तासा आहे तर बत्तासाही साखरच आहे. पाण्यात पडल्यानंतर बत्तासा आणि साखर निरनिराळे राहत नाहीत. त्याचप्रमाणे सचखंडात पोहचल्यावर आत्मादेखील प्रेमरूप बनतो.''

सखी सहेली राम रंग राती मन तन इच्छ पुजाए।

आपण सांगत आहात,''प्रेमरूप परमात्म्याने आत्म्यांना स्वत:च्या शय्येवर ठाव दिल्यानंतर आत्मे आनंदी व मंगलमय झाले. तेथे पोहचलेले इतर आत्मादेखील आशीर्वाद देण्यासाठी आले व आनंदाने गाणी गाऊ लागले. सर्वजण प्रभूरंगामध्ये न्हाऊन निघाले होते.''

नानक अचरज अचरज स्यों मिलया कहणा कछू न जाए।

गुरू अर्जुनदेवजी महाराजांनी अतिशय प्रेमाने आपणांस समजावले आहे की **हे जग विषय-विकारांचे जंगल आहे**. हे जग मृगजळ असून, ते आपली तृष्णापूर्ती करू शकत नाही.

यापासून आपला बचाव करण्यासाठी गुरू अर्जुनदेवजी महाराजांनी साधुंची संगत करण्याचा सल्ला दिला आहे. आता पाण्याचा थेंब समुद्रामध्ये जाऊन मिसळला गेला आहे. त्यामुळे परमात्मा तसेच आपला आत्मादेखील आश्चर्यचकीत झालेले आहेत, ज्याचे वर्णन आपली जिव्हा करू शकत नाही. कबीर साहेब सांगतात:

गई पुतली लूण की थाह सिंध की लेण।
अनाथ आप पाणी भई उलट कहे को बैण।।

***



प्रश्नोत्तरे

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे
संतबाणी आश्रम, १६ पी. एस. राजस्थान

एक प्रेमी: *महाराजजी, संत अंतर्यामी असूनही ते एखाद्या नामधारी व्यक्तीस असे का विचारतात की, तुला नाम मिळालेले आहे का?*

बाबाजी: तुमचे म्हणणे बरोबर आहे. सर्वसाधारणपणे संत स्वत:च्या गुणांचे प्रदर्शन करीत नाहीत. ते या जगात एखाद्या अजाण व्यक्तीप्रमाणे भोळेपणाने जीवन जगतात. काळास परमात्म्याकरवी वचन दिले गेले होते की संत या जगात येऊन आपल्या गुणांचे प्रदर्शन करणार नाहीत. मी जीवास जेथे जन्म देईन, तेथे त्याने आनंदाने रहावे. कोणासही या गोष्टीचे ज्ञान नसावे की गेल्या जन्मी मी कोठे होतो? संतांना एखाद्या जीवास सचखंडात आणावयाचे असल्यास त्या जीवाकरवी नामाची कमाई करवूनच त्यास आणावे. त्यामुळे परमात्म्याच्या आज्ञेचे पूरेपूर पालन करीत संत स्वत:च्या गुणांचे प्रदर्शन करीत नाहीत.

महाराज सावन सिंहजी सांगत असत,''एखाद्या नामाची कमाई केलेल्या संतांसाठी एखाद्या अंध व्यक्तीस नेत्र देणे वा लंगड्यास पाय देण अगदी किरकोळ गोष्ट आहे. त्या व्यक्तीच्या विभागातील सर्वजण नामदान घेण्यासाठी ताबडतोब तयार होतील, कारण हे जग चमत्कारासाठी हपापलेले आहे. परंतु संत असे करीत नाहीत.'' गुरू अर्जुनदेवजी देखील सांगत आहेत:

रिद्धि सिद्धि नामे की दासी।

महाराज सावन सिंहजी सांगत,''ज्याप्रमाणे सद्‌गृहस्थ कुणी वाममार्गाने संपत्ती कमावण्याऱ्याच्या घरचे अन्न-ग्रहण करीत नाही, तसेच महात्मा रिद्धी-सिद्धींचा उपयोग करीत नाहीत, चमत्कार करून दाखवत नाहीत.''

एक प्रेमी: *एक सत्संगी जोडप्यामधील स्त्री नामधारी नाही. पतीने नाम घेण्यापूर्वी आपल्या बायको सोबत सर्वसाधारण प्रापंचिक लोकांप्रमाणे विषय-भोग उपभोगले असतात. परंतु पतीने नाम घेतल्यानंतर ब्रह्मचर्य राखणे त्याच्याकडून अपेक्षित असते. परंतु पत्नीने नाम न घेतल्याने तसे करण्यास पतीला अवघड जाते त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. अशा परिस्थितीत पतीने काय करावे?*

बाबाजी: सत्य असे आहे की पती नामधारक असो वा पत्नी नामधारक असो. ते जर श्रद्धेने आणि प्रेमाने ध्यान-अभ्यास व नामस्मरण करत असतील तर एका सोबत्याच्या संगतीचा चांगला परिणाम दुसऱ्या सोबत्यावर नक्कीच पडतो. दुसरा सोबतीही नाम धारण करतो. परंतु नामधारक जर साशंक असेल, तर त्याचा दुसऱ्या सोबत्यावर काही परिणाम होत नाही. सत्संगी नेहमी दृढश्रद्धाळू व दृढप्रतिज्ञ असणे गरजेचे असते. त्याने विषय-विकारांना दूर सारणेदेखील आवश्यक असते. ती सत्संगीची जबाबदारी असते, कारण त्यानेच त्याच्या परिवाराचा उद्धार करावयाचा असतो.

एक प्रेमी: *महाराजजी, काही लोकांना त्यांच्या व्यवसायामुळे, जसे की मानसोपचार करणाऱ्या डॉक्टरास उपचार करण्याच्या निमित्ताने इतर लोकांच्या सान्निध्यात राहावे लागते त्यांच्याशी संपर्क ठेवावा लागतो. अशा वेळी इलाज करताना त्या लोकांची कर्मे स्वत:वर येऊ नयेत म्हणून डॉक्टरने कोणत्या प्रकारची काळजी घ्यावी?*

बाबाजी: कुणाच्या आजारावर उपचार करणे वाईट गोष्ट नाही. कुणाच्या सान्निध्यात राहणे वा त्यांच्याशी संपर्क ठेवणे वाईट नाही. तुम्ही नेहमी स्वत:च्या सतगुरूंवर विश्वास ठेवा. उपचार करताना कुणाबद्दलही वाईट विचार न आणता उत्कृष्टरित्या उपचार करा.

एक प्रेमी: *महाराजजी, काही वेळापूर्वीच तुम्ही जे उत्तर दिले, ज्या बाबतीत मी आदराने एक प्रश्न विचारू इच्छितो की कोणत्या सीमेपर्यंत संत रिद्धी-सिद्धीचा उपयोग करीत नाहीत आणि त्यांना रिद्धी-सिद्धीचा वापर कधी करावा लागतो? मी एका सत्संगामध्ये ऐकले आहे की महाराज कृपालजींनी एकदा एका सेवकाचे प्राण वाचविण्यासाठी बंदुकीची गोळी रोखली होती?*

बाबाजी: ती गोष्ट नीट समजून घ्यावी की तो काही चमत्कार नव्हता. मी अनेकदा सांगत असतो की सतगुरू सेवकासाठी स्वत:चे प्राणदेखील पणास लावतात. ही तर एक साधारण घटना असून तो काही चमत्कार नाही. महाराज कृपालजींनी कोठेही स्वत: या घटनेचा उल्लेख केला नाही. ही गोष्ट उघडकीस तेव्हाच आली जेव्हा एखाद्या प्रेमीने वा ज्याप्रेमीच्या बाबतीत ही घटना घडली त्या प्रेमीने ही गोष्ट इतरांना सांगितली. त्या प्रेमीचा प्रश्न चमत्काराबद्दल होता, परंतु तुम्ही विचारलेला प्रश्न हा कृपेबद्दल आहे.

सर्वसाधारणपणे गुरू आणि शिष्यांच्या दरम्यान अशाप्रकारच्या घटना घडतच असतात. सतगुरू अनेकदा सेवकास जळत्या आगीतून वाचवितात



आणि स्वत:वर लहानशा आजाराचे वा जखमेचे निमित्त दर्शवितात. सतगुरू इतर कुणासमोर त्या गोष्टीचा उल्लेख करीत नाहीत की मी अमुक एका प्रेमीचे कर्म स्वत:वर घेतले आहे, त्या प्रेमीसही सांगत नाहीत मी तुझे कर्म उचलले स्वत:वर घेतले आहे.

परमपिता सावनजींनी मला सांगितले होते, ''तुला देणारा तुझ्या घरी येईल.'' बलोचिस्तानी मस्ताना नावाचा सावन सिंहजी महाराजांचा एक शिष्य होता ज्याच्यावर त्यांनी अपार कृपा केली होती. मस्तानाजी आमच्या बागड़ प्रांतात नेहमी ये-जा करीत असत. त्यांनी नामाची कमाई करून अंतर्यात खूप प्रगती केलेली होती. एके दिवशी मी त्यांना विचारले की महाराज सावन सिंहजींनी मला सांगितले होते,''तुला देणारा तुझ्या घरी येईल; ते तुम्हीच आहात काय?'' मस्तानाजी म्हणाले, ''तो मी नाही. तो येईल. त्याने तर नामाची इतकी कमाई केलेली आहे की जर दोन देशांमधील युद्धामध्ये जर एकमेकांवर तोफा डागल्या जात असतील आणि त्याने हात वरती केल्यास तोफादेखील गोळे डागणे थांबवतील.'' गोळीतर एक सामान्य गोष्ट आहे. सतगुरूंनी नामाची खूप कमाई केलेली असते. ही त्यांची कृपा असते. मी एका भजनात लिहिले आहे, जे छापले गेल्यानंतर तुम्ही वाचाल:

चलण गोलियां ते हथ दे बचों दा धन्य कृपाल प्यारेया।

सतगुरूंच्या कृपेचे वर्णन केले जाऊ शकत नाही. जर सतगुरूंनीच सेवकाचे रक्षण केले नाही, त्याचा बचाव केला नाही, त्याची मदत केली नाही तर सतगुरूंशिवाय सेवकास कुणाचा आसरा आहे? परंतु सतगुरू हे सर्व पडद्याआड राहून करतात. अशावेळी ज्यांचे सतगुरूंवर खरे प्रेम, खरा लगाव असतो, त्यांना सतगुरू साक्षात दर्शनही देतात.

एक प्रेमी: *अनेकदा कुष्ठरोगी आणि गरीबांना पाहून मला त्यांची दया आली आणि मी त्यांना पैसे दिले. असे केल्याने त्यांच्या आणि माझ्यामध्ये कोणते बंधन तयार झाले? असे कर्म केल्याने बंधन निर्माण होते काय?*

बाबाजी: गुरू नानकदेवजींनी सांगितले होते की दानधर्म नेहमी विचारपूर्वक करणे गरजेचे आहे. कबीर साहेब सांगतात:

गुरु बिन माला फेरदे, गुरु बिन दिन्दे दान।
गुरु बिन दान हराम है, जाए पुच्छो वेद पुराण।।

स्वामीजी महाराज सांगतात, ''कुणी देत असलेल्या दानासाठी सतगुरू हपापलेले नसतात. परमात्म्याने दिलेले त्यांच्याकडे खूप काही असते. परंतु गुरू सेवकांवर परोपकार करण्यासाठी ते सेवकांकरवी दान करवितात. त्यामुळे त्यांची कृपा आपणांस मोफतच मिळते. केवळ सतगुरूंनाच माहीत असते की सेवकाचे धन कोठे वापरल्याने ते सफल होईल?''

एक प्रेमी: *माझा पहिला प्रश्न आहे की कोणत्या मंडळावर पोहचल्यावर आपले तीसरे नेत्र उघडते? दुसरा प्रश्न आहे की कोणत्या मंडळात गेल्यावर आपला जिवंतपणीच मृत्यु होतो? आणि तेथे पोहचल्याचे आपणांस आकलन कसे होते? तीसरा प्रश्न असा आहे की ज्या मुलांना त्यांचे तीसरे नेत्र दिसते, ती मुले विशेष असतात काय?*

बाबाजी: जेव्हा आपण अंतर्यात जातो तेव्हा आपल्याला आपोआपच लक्षात येते की कोणत्या मंडळामध्ये पोहचल्यावर आपले नेत्र उघडतात. अंतरामध्ये गेल्यावर आपोआपच आपल्या लक्षात येते की कोणत्या मंडळामध्ये गेल्यावर जिवंतपणीच मृत्यू येतो. ही काही सांगण्याची गोष्ट नाही तर स्वत: ध्यान-अभ्यास करून पाहण्याची गोष्ट आहे. ध्यान-अभ्यासी स्वत: तेथे पोहचून अनुभवतो. आपण हातावर खडीसाखर ठेवून कुणाला प्रश्न विचारला की ही खडीसाखर गोड आहे का? किंवा ती कधी गोड लागेल? असे प्रश्न विचारण्याऐवजी ती खडीसाखर तोंडामध्ये टाकून पहा! जेव्हा मुखात टाकून ती चघळू लागताच आपल्या लक्षात येईल की खडीसाखर गोड आहे.

याचप्रमाणे तुम्ही ध्यान-अभ्यास करून अंतर्यात गेल्यास तुम्हांला स्वत:लाच आकलन होईल. तुम्हास खडीसाखरेसमान औषध मिळाले असून

अंतर्यात जाण्याचे साधन आणि मार्ग मिळालेला आहे, सोबतच तुम्हांस मदत करणारे सतगुरू तुमच्या अंतर्यात तयार बसलेले आहेत. जोपर्यंत प्रश्न लहान मुलांचा आहे, साधारणत: मुलांचे लक्ष स्थिर असते, ते जगामध्ये विखुरलेले नसते. त्यामुळे बरीचशी मुले या ध्यान–अभ्यासामध्ये यशस्वी होतात. त्यांच्या आई–वडिलांचे लक्ष जगात विखुरलेले असल्याने, ते अंतर्यात काही पाहू शकत नाहीत. अनेकदा मुले सतगुरूंना अंतर्यात प्रगट करून घेतात, त्यांच्याशी गप्पा–गोष्टीही करतात.

एक प्रेमी: *या जगामध्ये अमुक इतक्या आत्म्यांचे येणे असे नक्की झालेले आहे वा आत्मा सतत येथे येतच राहतात?*

बाबाजी: तुम्ही अनुराग सागर* हे पुस्तक वाचा, त्याचा अर्थ व्यवस्थित समजून घ्या. तुमच्या प्रश्नांचे उत्तर तुम्हाला अनुराग सागरामध्येच मिळेल.

एक प्रेमी: *जेव्हा आपण सत्संगाच्या कार्यक्रमात एकत्र ध्यान–अभ्यास करीत असतो, त्यावेळी काही लोकं घोरत असतात. अशा वेळी आम्ही त्यांना सावध करावे वा घोरू द्यावे?*

बाबाजी: मी नेहमी सर्व ग्रुपमध्ये हेच सांगतो की प्रत्येक व्यक्ती आप–आपल्या कामात मग्न असतो. त्यामुळे एकाने दुसऱ्याच्या कामात दखल देऊ नये. तुम्ही स्वत:च्या कामात निमग्न रहावे. दुसरा कुणी जर घोरत असेल तर तो त्याचे काम करीत असतो. प्रिय मुलांनो, मनाने एकाची तर फसवणूक केलेली असते. त्यामुळे आपण जर आपल्या नामस्मरणावरून लक्ष हटवून त्या मनुष्याकडे लक्ष दिल्यास मन आपली देखील फसवणूक करीत असते. सत्संगींनी आपल्या आजुबाजूस होणाऱ्या आवाजाकडे लक्ष देऊ नये. त्यांनी स्वत:च्या तीसऱ्या तिळावर लक्ष एकाग्र केल्यास, आजुबाजूस काय होत आहे यावर लक्षही जाणार नाही. आपणांस त्या आत्म्याची दया आल्याने त्यास निद्रेमधून जागे केल्यास तो कदाचित बडबडही करेल. त्यामुळे तुम्हा सर्वांची अभ्यासातील एकाग्रता भंग होईल म्हणून त्याच्या घोरण्याकडे दुर्लक्ष करा.

* प्रेमाचा सागर



यावरून आपण हाच धडा शिकावयास हवा की आपले मन वेळोवेळी एकही संधी त्याच्या हातून वाया घालवित नाही. ध्यान–अभ्यासापासून अंग चोरणाऱ्यास निद्रा, भ्रम, काम व क्रोध या सर्व गोष्टी विळखा घालून बसतात. स्वामीजी महाराज प्रेमाने सांगतात :

जो जो चोर भजन के प्राणी से से दुख सहे।
आलस नींद सतावें उनको नित नित भ्रम गहे।
काम क्रोध के धक्के खावें लोभ नदी में डूब मरे।।

एक प्रेमी: *प्रिय महाराजजी, तुम्ही अंतर्ज्ञानी आहात, तरीही मला वाटते की मी माझ्या काही गोष्टी तुम्हांस सांगाव्यात. मी त्या गोष्टी तुमच्याशी बोलू की मी नामस्मरण करीत रहावे?*

बाबाजी: तुम्ही नामस्मरणच करीत रहावे, नामस्मरण आपोआपच सर्व गोष्टी सांगेल. शब्द आणि आत्म्याची भाषा एकच असून तेथे दुभाषिकाची (भाषांतर करणाऱ्याची) गरज नसते. ते त्यांच्या भाषेत स्वत:च चर्चा करतात. एखाद्या शब्द–नामाची कमाई केलेल्या संतांना दुसऱ्या भाषेत बोलणे अतिशय सोपी गोष्ट असते. परंतु येथे येऊन संत आडपडदा ठेवतात. काही माहीत नसल्यासारखे दर्शवून साधारण जीवन जगतात.

संत असा चमत्कार करून दाखवीत नाहीत, परंतु जेथे शब्द आणि आत्म्याची आपआपसामध्ये चर्चा होणार असते ती त्यांच्या भाषेतच होणार असते. अनेक प्रेमी पत्र लिहून कळवितात की तुम्ही अंतर्यात असे म्हणालात, परंतु पत्रामध्ये असे नमूद कधीच करीत नाहीत की तेथे भाषांतर करण्याची पप्पु वा एलविया उपस्थित होते.

सुरुवातीला मी अमेरिका येथील संतबाणी आश्रमात गेलो, तेव्हा माझ्या प्रथम संदेशामध्ये मी हेच सांगितले होते की, अंतर्यात शब्द आणि आत्म्यास कुणा भाषांतर करणाऱ्याची गरज नसते. तेथे त्यांची स्वत:ची भाषा असते, ज्या भाषेत ते चर्चा करतात. मला आंनद वाटतो की, परमपिता कृपाल माझे हे सांगणे प्रत्यक्षात घडवित आहेत. तुमच्या तसेच इतर अनेक देशांमधून मला पत्रे येतात की अंतर्यात अशा तऱ्हेने आपली चर्चा झाली, तुम्ही स्वप्नामध्ये येऊन मला असे–असे सांगितले वा माझ्या ऑपरेशनच्या वेळी माझे कशाप्रकारे रक्षण केलेत.

एक प्रेमी: *ध्यान–अभ्यासासाठी बसताना आपण जी बैठक बनवितो, त्याचा अभ्यासावर काय परिणाम होतो? ध्यान–अभ्यास मांडी घालून बसल्याने चांगला होतो की खुर्चीवर बसून केल्याने चांगला होतो?*

बाबाजी: ज्या आसनात तुम्ही जास्त वेळ न हलता आरामात बसू शकाल त्या आसनाचा ध्यान–अभ्यासासाठी तुम्ही अवलंब करा. मांडी घालून बसणे हे सर्वात आरामदायक आणि नैसर्गिक आसन आहे.

एक प्रेमी: *मनुष्याने शरीर सोडल्यावर तीन दिवसांनंतरच त्याचे अंतिमसंस्कार का केले जातात?*

बाबाजी: हे पहा बंधुंनो, ही विचार करण्याची बाब आहे. हे आप–आपल्या देशातील आणि समाजांमधील रिती–रिवाजांना अनुसरूनच होत असते. हिंदुस्थानात मृत्युनंतर तीन दिवस काय, तीन तास देखील पार्थिव शरीर ठेवण्यास लोकं राजी नसतात.

एक प्रेमी: *असे शक्य असते का की आपण अंतर्यात जाताना पुढे जाण्यापूर्वी आपणांस एखाद्या ठिकाणी काही काळाकरीता थांबविले जाते आणि मगच पुढे नेले जाते?*

बाबाजी: ही समजून घेण्यासारखी बाब आहे. हे प्रेमीच्या एकाग्रतेवर अवलंबून असते. तुमचे नामस्मरण, प्रेमाने आणि नामाशी एकरंग होऊन निरंतर चालू राहीले व जर तुम्ही तिसऱ्या तिळावर एकाग्र होऊ लागला असाल तर ज्याप्रमाणे एखादी बंदुकीची गोळी अतिवेगाने पुढे जाते त्याप्रमाणे आत्मा अंतर्यात वरच्या दिशेला मार्गक्रमण करू लागतो. आत्म्यास अटकाव आपल्या विचारांचा आणि आपल्या कर्मांचाच असतो.

एक प्रेमी: *निद्रावस्थेत जर विर्यस्खलन झाले तर याचा अर्थ काम–वासनेच्या संघर्षामध्ये आपला विजय समिप आला आहे असा होतो की तो विजय अतिशय दूर आहे असा होतो?*

बाबाजी: हे पहा बंधुंनो, ज्यांची निद्रा अतिशय गाढ असते, त्यांना हा आजार जडलेला असतो. यामध्ये हार–जीत याचा काहीच संबंध नसतो. बालपणी केलेल्या चुकांमुळे मनुष्यास पुढे आयुष्यभर पस्तावत राहवे लागते. परंतु अभ्यासी व्यक्तीचे स्वप्नातदेखील कधीही असे विर्यस्खलन होत नाही. गुरू नानकदेवजींनी सांगितले होते :

सुपने बिंद न देही झरना तिस पांखडी जरा न मरना।

या जगामध्ये असेही आत्मे येतात ज्यांचे शरीर स्वप्नामध्येही झिरपत नाही. त्यांच्यावर मायेचा काहीच परिणाम होत नाही. स्त्री करीता पुरुष लोभिवंत माया तर पुरुषासाठी स्त्री लोभिवंत माया आहे. त्याच गोष्टी यांना येथे अडकवून ठेवतात. परंतु या जगामध्ये असेही आत्मे येतात ज्यांच्यावर या गोष्टींचा परिणाम होत नाही.

***

भक्तीचे ईनाम

परमसंत अजायब सिंहजी महाराजांद्वारे ध्यान-अभ्यासात बसविण्यापूर्वी प्रेमींना दिलेला संदेश, संतबानी आश्रम, १६ पी.एस. राजस्थान - १ डिसेंबर १९८३



परमपिता सावन-कृपालजींच्या चरणी नमस्कार करतो. त्यांनी आपणां गरीब आत्म्यांवर दया केली आणि त्यांच्या भक्तीचे दान दिले. प्रियजनहो, परमात्मा भक्तीचे वाटप तुम्ही कितीही केले तरीही ती संपत नाही. भक्ती-

धनाची चोर चोरी करू शकत नाही व अग्नी त्या धनास जाळूही शकत नाही. एखादा लूच्चा व फसव्या मनुष्य परमात्म्याच्या भक्तीशी फसवेगीरी करू शकत नाही.

आपणांस सतगुरूंद्वारा परमात्म्याच्या भक्तीचे दान मिळते. सतगुरू या जगामध्ये येताना **भक्तीचे इनाम** घेऊन येतात. ते आपणांस हे इनाम देऊन आपल्यावर मेहरबानी केल्याचे दर्शवितही नाहीत. परंतु प्रश्न असा आहे की या परमात्म्याच्या **भक्तीचे इनाम** आपण किती ग्रहण करू शकतो?

गुरू अर्जुनदेवजींनी या इनामास जीवनदान असे संबोधले आहे. सतगुरू आपल्या आत्म्यास परमपिता परमात्म्याशी जोडतात. ते आपणांस नामदान देऊन परमात्म्याशी आपली भेट घडवितात. सतगुरू त्यांनी जीवनभर केलेल्या कमाईचे दान आपणांस देऊन, आपणांकरवी भक्ती करवितात.

गुरू नानकदेवजी महाराज सांगतात, ''जे जीव पहाटे उठून आपले ध्यान सतगुरू चरणी एकाग्र करतात, तेच जीव भाग्यशाली आहेत.''

जेव्हा ग्रुप येथे येतात, तेव्हा कार्यक्रमाच्या सुरूवातीला तसेच अखेरच्या दिवशी त्या आत्म्यांना काही गोष्टी आठवण करून देतो की, ध्यान–अभ्यासास बसण्यापूर्वी पाच पवित्र नामांची आठवण करा. एखादे जर अतिशय महत्वाचे व त्वरीत केले जावे असे काम असेल तर ते लवकरात लवकर पूर्ण करा आणि मग ध्यान–अभ्यासासाठी बसा, जेणेकरून त्या कामाच्या आठवणीने तुम्ही अस्वस्थ होऊ नये. ध्यान–अभ्यासास कधीही ओझे न समजता, तो प्रेमाने व आपुलकीने करा. जे काम आपण प्रेम–आपुलकीने करतो, त्या कामाचा सर्वत्र स्विकार होतो.

प्रियजनहो, अशी निमित्त सांगत राहू नका की आम्ही कौटुंबिक गृहस्थ आहोत, आम्ही परमात्म्याची भक्ती कशी बरे करू शकतो? कौटुंबिक जीवन व्यतीत केलेले अनेक गुरू होऊन गेले आहेत. कौटुंबिक जीवनाचा

अर्थ आपल्या उपजिविकेचे साधन स्वमेहनतीने कमावणे असा होतो. आप-आपल्या कर्मांनुसार ज्या-ज्या जबाबदाऱ्या आपणांस मिळालेल्या आहेत, त्यांची आपूर्ती आपण करावयाची आहे. सर्वप्रथम आपण सतगुरूंचे ध्यान धरावे. आपण सतगुरूंना दिलेल्या वचनाची पूर्तता करावयाची आहे. पहाटे लवकर उठून सतगुरूंना दिलेल्या वचनानुसार सर्वप्रथम आपल्या ध्यान-अभ्यासावर लक्ष द्या.

प्रत्येक आत्मा मातेच्या गर्भात असताना उलटा लटकलेल्या अवस्थेत असतो, जेथे तो कोणतीही हालचाल करू शकत नाही. ती जागा अतिशय अरूंद व अंध:कारमय असते जेथे आत्मा नामाच्या आसऱ्यानेच जगत असतो. आत्म्यास प्रत्येक श्वासा-श्वासास तेथे नामाचा आधार मिळत असतो. त्यावेळी आत्मा परमपिता परमात्म्यास विणवणी करतो,''हे परमात्मा, या तुरुंगातून माझी सुटका कर. मी तुला वचन देतो की मी माझ्या वेळेतील दहावा भाग आणि माझ्याकडे जे काही असेल त्याचा दहावा भाग तुला अर्पण करीन.''

प्रेमी स्वकमाईतील दहावा भाग तर देतात. शेतकरी शेतातील पिकाचा दहावा भाग आपल्या गुरूंना देतो. नोकरदार व्यक्ती पगार झाल्यावर त्यातील दहावा भाग गुरूंसाठी बाजूला काढून ठेवतात. अनेक प्रेमी आपल्या मिळकतीतील दहावा हिस्सा गुरूंना अर्पण करतात परंतु हजारोंमध्ये विरळाच एखादा प्रेमी सापडेल, जो स्वत:च्या वेळेतील दहावा भाग ध्यान-अभ्यासासाठी वापरत असेल. आईच्या गर्भामध्ये अडकलेलो असताना अडीच तास ध्यान-अभ्यास करण्याचे जे वचन आपण परमात्म्याला दिलेले असते, ते वचन पूर्ण करणे अतिशय आवश्यक आहे.

महाराज कृपालजींच्या सूचनांनुसार आपण डायरीचा वापर करावयास हवा, ध्यान-अभ्यास करीत आपले जीवन सफल करावयास हवे. आता नेत्र मिटून तुम्ही नामस्मरणाची सुरूवात करा.

***

धन्य अजायब

परम संत अजायब सिंहजी महाराजांच्या मधुर आठवणीतील
संत-बानी आश्रमातील सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती



सन्तबानी आश्रम १६ पी एस राजस्थान येथील कार्यक्रम

०२ फेब्रुवारी ते ०६ फेब्रुवारी २०१७
०३ मार्च ते ०५ मार्च २०१७
३१ मार्च ते ०२ एप्रिल २०१७